: शोधप्रबंध आराखडा :

"मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यमापन "
(२००६-०७ ते २०१५-१६)

सामाजिकशास्त्रे विद्या शाखेच्या **अर्थशास्त्र** विषयात पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठास सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

: संशोधक :

अमोल मनोहरराव घाटगे

सहशिक्षक

शारदा विद्यालय (माध्यमिक), परभणी

: मार्गदर्शक :

डॉ.आर.एम. भालेराव

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

शारदा महाविद्यालय, परभणी

: संशोधन केंद्र :

अर्थशास्त्र विभाग,

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

मार्च २०१६

"मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यमापन" (२००६-०७ ते २०१५-१६)

'नहि ज्ञानेनं सदृशं पवित्रमिह विद्यते!' ज्ञानासारखे पवित्र असे दुसरे काहीच नाही असे म्हणण्यात येते, कारण भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून शिक्षणाला अतिशय महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. वैदिक कालखंडात शिष्याला धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ही चार उद्दिष्टे साध्य करण्यासाठी गुरुगृही शिक्षण घ्यावे लागे. शिक्षण घेत असताना शिष्य हे आपलेच मुल असून त्याच्या गरजांकडे लक्ष देणे आपले परम कर्तव्य आहे असे गुरु मानित असत. पुढील काळात वैदिक शिक्षण पध्दतीत असणारे दोष दूर करण्यासाठी बौध्द शिक्षण पध्दतीची सुरुवात झाली. इ.स. पूर्व ६०० मध्ये संन्याशांच्या मठातून बौध्द शिक्षण सुरु झाले. शिष्यांना संघामध्ये समाविष्ठ होऊन गुरुच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करावा लागे. बौध्द कालखंडात गुरुनिष्ठेपेक्षा संघनिष्ठेला महत्त्व प्राप्त झाले. शिक्षण देणाऱ्या संस्थांची निर्मिती याच काळात झाली. इ.स. १२०६ ते १८५८ च्या काळात भारतीय शिक्षण पध्दतीवर मुस्लीम राजवटीचा परिणाम झाला. मदरसा आणि मकतब यांच्या साह्याने शिक्षण व धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला. इ.स. १७६५ सालापासून ब्रिटीश राजवटीखालील शिक्षण पध्दतीस सुरुवात झाली. तेव्हा लोकांना प्रांतीय भाषेतून शिक्षण देण्यात येत असले तरी पाश्चिमात्य साहित्य आणि शास्त्रांचे शिक्षण मात्र केवळ इंग्रजी भाषेतून देण्यात येऊ लागले.

आधुनिक काळात अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मानवी मुलभूत गरजाबरोबर शिक्षण ही चौथी मुलभूत गरज झाली आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर लोकशाही शासनपध्दतीचा स्वीकार केला. भारतामध्ये सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्य निर्माण करण्यात आले. सर्व भारतीय नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची शाश्वती देण्यात आली. लोकशाही विकेंद्रीकरणाचा स्वीकार करून त्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांचा स्वीकार करण्यात आला. पंचायत राज

व्यवस्थेची स्वरुप व रचना निश्चित करण्यासाठी केंद्रशासनाने २६ जानेवारी १९५७ रोजी बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीच्या अहवालानुसार राज्यशासनाला स्थानिक स्वराज्य संबंधी कायदे करण्याचे आवाहन करण्यात आले.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था कशी अंमलात आणता येईल, याचा सखोल अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन महसूल मंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली २७ जून १९६० रोजी समिती नेमण्यात आली. समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६९' कायदा मंजूर केला. त्यानुसार १ मे १९६२ रोजी महाराष्ट्र पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. 'शिक्षण विभाग' स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सोपविण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. त्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक विकासाचे एक प्रभावी साधन आहे. जीवन सुखी-समृधी होण्यासाठी बालकांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. 'सर्वांसाठी शिक्षण आणि शिक्षणासाठी सर्व' हे ब्रीद साध्य करण्यासाठी शासकीय पातळीवरुन अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. विविध योजना अंमलात आणल्या जात आहेत. मोफत पाठ्यपुस्तक योजना, खडूफळा मोहिम, जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (D.P.E.P.), शालेय पोषण आहार योजना, तसेच २००१-०२ सालापासून सर्व शिक्षा अभियान यासारख्या योजनांचा शासनाने अवलंब केला आहे.

मानवी विकासाचे महत्त्वपूर्ण साधन म्हणून स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ख्रिस्ती मिशनरी, खाजगी संस्था, विचारवंत, शासकीय कायदे आणि अहवाल ज्यामध्ये

मॅकोलेचे टिपण, लॉर्ड विल्यम बेटिंगचे आज्ञापत्र, वुडचा खलीता, लॉर्ड कर्झनचे शैक्षणिक धोरण, १९८२ चा हंटर आयोग, १९०२ चा विद्यापीठ आयोग, सार्जंट अहवाल आणि म. गांधी यांची वर्धा शिक्षण योजना यासारखे अनेक प्रयत्न करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये शासनाने वेळोवेळी धोरणे आखून, कायदे करुन आणि शिक्षण विषयक समित्यांच्या स्थापना करुन महत्त्वपूर्ण भूमिका बजावली ज्यामध्ये १९४८ ची ताराचंद समिती, राधाकृष्णन विद्यापीठ आयोग, १९६२ ची नरेंद्रदेव समिती, १९६८ चे शैक्षणिक धोरण, १९७७ ची ईश्वरभाई पटेल समिती, १९८६ चे शैक्षणिक धोरण आणि राज्यशासनाने केलेले कायदे ज्यामध्ये मुंबई प्राथमिक शिक्षण आयोग-१९४७, भूतपूर्व हैद्राबाद प्राथमिक शिक्षण कायदा-१९५६ यासारखे अनेक कायदे व आयोगाच्या माध्यमातून प्रयत्न करुन देखील शासनास फारसे यश मिळाल्याचे दिसत नाही. विद्यार्थ्यांची होणारी गळती आणि स्थगिती या समस्या घर करुन राहिल्या आहेत. इ.स. १९७३ मध्ये मुलांच्या गळतीचे प्रमाण ६२ टक्के आणि मुलींच्या गळतीचे प्रमाण ७६ टक्के होते. त्याच वर्षीचा पहिलीच्या वर्गातील स्थगनाचा निर्देशांक ४० टक्के होता. त्याच कारणामुळे विद्यार्थी गळती स्थगिती थांबविण्याच्या उद्देशाने तसेच शालेय शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी १९८५ मध्ये 'मानव संसाधन विकास मंत्रालय' ची स्थापना करण्यात आली. त्या अंतर्गत 'शिक्षण विभाग' समाविष्ट करण्यात आला. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी कठोर अंमलबजावणीवर भर देण्यात आला. शिक्षणाची गुणवत्ता टिकून राहावी म्हणून कृती कार्यक्रमांचा स्वीकार केला.

जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम (D.P.E.P.) :

जागतिक बँक, युनेस्को आणि युनिसेफ यांनी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध असल्याचे सांगितले. जगातील विविध देशांनी प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या दिशेने भरीव वाटचाल केली आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार यांनी जागतिक बँकेच्या साह्याने 'सामाजिक सुरक्षा'

कार्यक्रमाच्या अंतर्गत 'जिल्हा प्राथमिक शिक्षण' प्रकल्प देशामधील तामीळनाडू, कर्नाटक, केरळ, हरियाणा आणि महाराष्ट्र राज्यामध्ये सुरु केला.

महाराष्ट्र राज्यामध्ये केंद्रशासन आणि जागतिक बँक यांच्या साह्याने अंदाजित १८९ कोटी रुपयाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात आला. प्रथम टप्प्यात मराठवाड्यातील औरंगाबाद, उस्मानाबाद, नांदेड, लातूर आणि परभणी या पाच जिल्ह्यासाठी १९९३-९४ साली प्रकल्प सुरु करण्यात आला. या पाच जिल्ह्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय स्त्री साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा फारच कमी होते, दुसऱ्या टप्प्यात शासनाने मराठवाड्यातील जालना आणि बीड तसेच उर्वरित महाराष्ट्रातून धुळे आणि गडचिरोली या चार जिल्ह्यात १९९६-९७ मध्ये योजना राबविली. सदरील योजनेसाठी ८५ टक्के केंद्रशासन आणि १५ टक्के राज्यशासनाचे अनुदान मिळाले. योजनेअंतर्गत दाखलपात्र सर्व मुलांना शाळेत प्रवेश उपलब्ध करुन देणे, ६ ते १४ वयोगटातील मुलांची गळती आणि स्थगिती थांबविणे, विद्यार्थ्यांची किमान अध्ययनक्षमता निर्माण करणे तसेच सबळ मनुष्य विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. महाराष्ट्र राज्यातील एकूण ९ जिल्ह्यामध्ये हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला त्यामध्ये ७ मराठवाडा विभागातील जिल्ह्याचा समानेश होतो. तेव्हा परभणी आणि हिंगोली हे स्वतंत्र जिल्हे नव्हते. म्हणून प्रकल्प देखील संयुक्तपणेच राबविला गेला. अर्थात मराठवाडा विभागातील प्रत्येक जिल्ह्यात सदरील प्रकल्प राबविण्यात आला होता. त्याच काळात २२ नोव्हेंबर १९९५ मध्ये शालेय पोषण आहार योजना देखील सुरु करण्यात आली. पुढे या योजनेचा समावेश सर्व शिक्षा अभियानात करण्यात आला.

सर्व शिक्षा अभियान :

सन २००१-०२ मध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाने आखलेल्या योजनेमधून उद्दिष्टपूर्ती होऊ शकली नाही. त्यामुळे भारत सरकारने 'सर्व शिक्षा अभियान' हा कालबध्द कार्यक्रम आखला. या योजनेची कालमर्यादा २०१० पर्यंत

ठरविण्यात आली. या योजनेनुसार १० वर्षाच्या कालावधीत केंद्र आणि राज्यशासनाने प्राथमिक शिक्षणावरील सर्व योजनाकरिता, विभागवार केलेल्या सर्व गुंतवणूकीचा समावेश सर्व शिक्षा अभियान मोहिमेत करण्यात आला. ज्यामध्ये गणवेश व लेखन साहित्य पुरवठा योजना, उपस्थिती भत्ता, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना, पुस्तकपेढी योजना, खडू-फळा मोहिम आणि शालेय पोषण आहार योजना यासारख्या विविध योजनांचा समावेश आहे.

शालेय पोषण आहार योजना (Mid-day Meal Scheme) :

सदरील योजना पहिली ते पाचवी इयत्ता मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व जाती-जमाती आणि आर्थिक स्तरावरील सर्व मुला-मुलींसाठी राबविली जात आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी टिकून राहावित हाच योजनेचा मुख्य उद्देश आहे. वाड्यावस्तीवरील बहुतांश विद्यार्थी सकस, चौकस आहाराअभावी आपले प्राथमिक शिक्षण व्यवस्थिपणे पूर्ण करु शकत नाहीत. विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले न राहण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे अपुरा आहार किंवा अर्धवट जेवण हेच आहे. त्यामुळे अनेक स्थानिक स्वराज्य संस्था, कंटोमेंट बोर्ड, महानगरपालिका यांनी शाळेच्या मध्यांतरात जेवण, दुध, अंडी, कडधान्य शिजवून देणे, पाव देणे, सुकडी वाटप करणे, खिचडी शिजवून देणे यासारखे उपक्रम हाती घेतले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ झाल्याचे दिसून आले. त्यामुळे केंद्र, राज्यशासन आणि न्यायालयाकडून सदरील योजना प्रभाविपणे राबविण्याचे आदेश देण्यात आले. योजनेच्या अंमलबजावणीत असंख्य अडचणी असल्या तरी दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना योजनेचा खूप फायदा होत आहे. हे मात्र निश्चित आहे. अंमलबजावणीतील अडचणी कार्यवाहीतील मतभिन्नता असली तरी सदरील योजना अतिशय स्तुत्य उपक्रम आहे यामध्ये तिळमात्र शंका नाही.

अध्ययन विषयाची आवश्यकता :

स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून अर्थात १९०१ पासूनच भारतात जनगणनेच्या माध्यमातून साक्षरतेचे प्रमाण शोधण्याचे प्रयत्न करण्यात आले होते. त्यामध्ये भारतीय साक्षरतेचे प्रमाण १९०१ (५.३५ टक्के), १९११ (५.९२ टक्के), १९२१ (७.१६ टक्के), १९३१ (९.५० टक्के), १९४१ (१६.१० टक्के), १९५१ (१६.६७ टक्के), १९६१ (२४.०२ टक्के), १९७१ (२९.४५ टक्के), १९८१ (३६.२३ टक्के), १९९१ (४२.८४ टक्के), २००१ (६४.८३ टक्के) तर २०११ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ७४.०४ टक्के होते. ज्यापैकी पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८२.१४ टक्के आणि स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६५.४६ टक्के होते.

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील साक्षरतेचा दर ८२.३४ टक्के होता. त्याचप्रमाणे मराठवाडा विभागातील जिल्ह्यांच्या साक्षरतेचे प्रमाण पुढील तक्त्यात सविस्तर दर्शविले आहे.

मराठवाड्यातील साक्षरता दर

अ.क्र.	जिल्हा	साक्षरता दर (टक्के)
१	उस्मानाबाद	६८.६४
२	औरंगाबाद	६७.६५
३	लातूर	६७.२६
४	हिंगोली	६७.१६
५	बीड	६६.४८
६	नांदेड	६५.१४
७	परभणी	६३.०६
८	जालना	६१.०३
	महाराष्ट्र	८२.३४
	भारत	७४.०४

संदर्भ : भारतीय जनगणना २०११

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, २०११ च्या जनगणनेनुसार भारताचा साक्षरता दर ७४.०४ टक्के होता तर महाराष्ट्र राज्याचा साक्षरता दर ८२.३४ टक्के होता. मराठवाडा विभागातील प्रत्येक जिल्ह्याचा साक्षरता दर हा त्याहीपेक्षा कमी आहे.

मराठवाड्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे असल्याने सर्व स्तरांपर्यंत शिक्षण पोहचवणे गरजेचे आहे. त्याशिवाय मराठवाड्याच्या विकास होणे शक्य नाही. याकरिता आर्थिक मदत, विशेष मार्गदर्शन, भरीव आर्थिक तरतूद आणि शिक्षण विषयक सकारात्मक जाणीव इत्यादी बाबी अत्यावश्यक आहेत.

मराठवाडा विभागात शिक्षण विषयक उपक्रमात दारिद्र्य हा घटक प्रामुख्याने अडसर आहे. विभागातील अनेक लोकांना अन्न ही मुलभूत गरज पूर्ण करणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचा शिक्षणाकडे कल नसल्याचे दिसते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेपासून वंचित राहावे लागते. जी मुले शाळेत प्रवेश घेतात ती शेवटपर्यंत टिकून राहत नाहीत. शालेय विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. त्यामुळे १९९५-९६ मध्ये 'पोषण आहार योजना' सुरु करण्यात आली. पुढे त्याचा समावेश 'सर्व शिक्षा अभियान' मध्ये करण्यात येऊन 'शालेय पोषण आहार' असे संबोधण्यात आले.

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांची गळती थांबवून १०० टक्के गुणवत्ता राखली जावी, यासाठी शाळेत विद्यार्थ्यांना मध्यांतरात 'मध्यान्न भोजन' व्यवस्था होत असल्याने योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. शाळेची संख्या, विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

१७ ऑगस्ट २००८ रोजी 'राष्ट्रीय शालेय मध्यान्ह भोजन कार्यक्रम' योजना केंद्र सरकारने सर्व राज्यातील सर्व तालुक्यामधील शाळांमध्ये राबविण्याचा निर्णय घेतला. सदरील योजना केवळ प्राथमिक वर्गांना लागू होती जी सन २००८ पासून सहावी ते आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यास सुरुवात झाली. सर्व शिक्षा अभियानांतर्गत पात्र मदरसा, मतकब यांना देखील योजना लागू करण्यात येणार असल्याचे शासनाने जाहीर केले.

केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त सहकार्याने प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता शालेय पोषण आहार योजना राबविल्या जात आहे. केंद्र सरकारने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून खर्च मर्यादित दरवाढ मंजूर केली आहे. त्यानुसार राज्यशासनाने ही ७.५ टक्के दरवाढ केली आहे. सुधारित दरानुसार प्राथमिक शाळेतील प्रति लाभार्थीला ३.५९ पैसे आणि उच्चप्राथमिक शाळेतील प्रति लाभार्थीला ५.३८ पैसे मिळणार आहेत.

२०१५-१६ या शैक्षणिक सत्रासाठी दि. १७ एप्रिल २०१५ च्या निर्णयानुसार शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांच्याकडून ६९६ कोटी ३५ लाख ९२ हजार रुपयाचा निधी मंजूर करुन वितरित करण्यात आला आहे. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत कसा खर्च होत आहे? त्याचा विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि शाळांना कसा लाभ होत आहे? हे अभ्यासणे महत्त्वाचे वाटल्याने त्यामुळेच "मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यमापन" (२००६-०७ ते २०१५-१६) या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली.

अध्ययनाची उद्दिष्टे :

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेचा अभ्यास करण्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शालेय पोषण आहार योजनेची अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार अनुदान प्रवृत्ती तपासणे.

२) मराठवाडा विभागात शालेय पोषण आहार योजनेवर केलेल्या खर्चाचा अभ्यास करणे.

३) मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेवर जिल्ह्यानिहाय केलेल्या खर्चाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४) मराठवाड्यातील जिल्हानिहाय शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.

५) शालेय पोषण आहार योजनेची मुख्य उद्दिष्टे कितपत साध्य झाली आहेत याचा आढावा घेणे.

६) शालेय पोषण आहार योजनेचा अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर होणारा परिणाम तपासणे.

७) शालेय पोषण आहार योजने संदर्भातील भौतिक सुविधांची वास्तविक स्थिती तपासणे.

८) संशोधनांती निष्कर्ष काढून उपयुक्त शिफारशी सूचविणे.

अध्ययनाची गृहिते :

१) केंद्रशासन आणि राज्यशासन यांचा शिक्षणावरील खर्च अलीकडील काळात वाढत चालला आहे.

२) मराठवाडा विभागातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील पटनोंदणी आणि उपस्थिती वाढत आहे.

३) मराठवाडा विभागातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील गळती आणि स्थगितीचे प्रमाण घटत आहे.

४) मराठवाडा विभागात शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी संख्येत वाढ होत आहे.

५) शालेय पोषण आहार योजनेमुळे मराठवाडा विभागातील शैक्षणिक स्थितीवर धनात्मक परिणाम होत आहे.

६) मराठवाडा विभागातील अस्पृश्यता आणि लिंगभेद कमी होऊन शैक्षणिक गुणवत्ता वाढत आहे.

संशोधन पध्दती :

"मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यमापन" (२००६-०७ ते २०१५-१६) च्या संशोधनासाठी प्राथमिक सामुग्री (Primary data) आणि दुय्यम सामुग्री (Secondary data) चा आधार घेण्यात येईल.

अ) प्राथमिक साधन सामग्री :

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये मराठवाडा विभागातील एकूण आठ जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांची संख्या विचारात घेऊन जिल्हानिहाय २.५ टक्के शाळांची निवड यादृच्छिक नमुना पध्दतीने केली जाईल. त्याचे सविस्तर विवरण पुढील तक्त्यात दिले आहे.

नमुना निवड तक्ता

अ.क्र.	जिल्हा	शाळांची संख्या	नमुना निवड
१	औरंगाबाद	३२७०	८२
२	बीड	२६७७	६७
३	नांदेड	२५७१	६४
४	लातूर	१८१५	४५
५	परभणी	१७७२	४४
६	जालना	१७४८	४४
७	उस्मानाबाद	१२६८	३२
८	हिंगोली	११३२	२८
	मराठवाडा	१६२५३	४०६

उपरोक्त तक्त्यात दिलेल्या माहितीनुसार एकूण ४०६ प्राथमिक शाळांची मराठवाडा विभागातून निवड करण्यात येईल. तसेच ठरवून दिलेल्या नमुना निवडीनुसार प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक किंवा शिक्षक यांच्याकडून सहेतूक पध्दतीने पूर्वनिश्चित प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती मिळविण्यात येईल. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल.

ब) दुय्यम साधन सामग्री :

दुय्यम साधन सामुग्रीमध्ये जिल्हापरिषद अहवाल, अर्थसंकल्प, सांख्यिकी कार्यालय, जिल्हा परिषदांची प्रकाशन, पुस्तके, दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, विविध अहवाल, लेख, शासन निर्णय आणि इंटरनेटच्या साह्याने दुय्यम साधन सामुग्री मिळवून संशोधनाकरिता वापरण्यात येईल. दुय्यम साधनसामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. तसेच तक्ते व आलेखांच्या साह्याने विश्लेषण करण्यात येईल.

अध्ययन कालावधी :

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शासन विविध योजनावर खर्च करीत असते. त्यापैकी शालेय पोषण आहार योजनेवर मराठवाडा विभागात केलेल्या खर्च व लाभाचा अभ्यास करण्यासाठी इ.स. २००६-०७ ते २०१५-१६ पर्यंतचा कालावधी विचारात घेतला जाईल.

अध्ययन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

"मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यमापन" (२००६-०७ ते २०१५-१६) या संशोधन विषयासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रशासकीय विभागापैकी मराठवाडा विभागाची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील एकूण आठ शैक्षणिक विभागापैकी औरंगाबाद विभाग आणि लातूर विभागाचा समावेश मराठवाड्यात करण्यात येतो. यामध्ये औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर, नांदेड या जिल्ह्याचा समावेश आहे. या आठही जिल्ह्याची अध्ययनासाठी निवड केली आहे.

प्रकरणाची रुपरेषा :

प्रकरण १ ले : प्रास्ताविक

प्रकरण २ रे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण ३ रे : मराठवाडा विभागाची पार्श्वभूमी

प्रकरण ४ थे : शालेय पोषण आहार योजनेची भूमिका

प्रकरण ५ वे : मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत जिल्हानिहाय खर्च.

प्रकरण ६ वे : मराठवाडा विभागातील शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यमापन.

प्रकरण ७ वे : निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ सूची :

०१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २००६-०६ ते २०१४-१५, जिल्हा सांख्यिकीय अहवाल.

०२. प्राथमिक शिक्षण : सद्यस्थिती, समस्या व उपाय - प्रा.वामन गो. भाळवणकर, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, पहिली आवृत्ती, २४ नोव्हेंबर २००६.

०३. भारतीय शिक्षणाचा इतिहास - डॉ.गणेश शेटकर, डॉ.शारदा शेवतेकर, डॉ.शोभना जोशी, मृण्मयी प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, सप्टें. २००२.

०४. महाराष्ट्रातील निम्नस्तर मानवी विकास जिल्ह्यांचा आर्थिक विकास - सद्यस्थिती व उपाय, शोधप्रबंध डॉ.र.पू. कुरुलकर, २००६.

०५. मिशन २००५ सर्व शिक्षा अभियान अंमलबजावणी - महाराष्ट्र शासन.

०६. स्पर्धा परीक्षा जनरल नॉलेज मासिक - २०१२, डॉ.आनंद पाटील.

०७. सेवांतर्गत प्रशिक्षम कार्यक्रम (२००६-०७), शिक्षक मार्गदर्शिका, म.रा.शै.सं.व.प्र.प. पुणे-३०.

०८. Beyond the Human Development Index, Kumbar Sangita, Basak Ashok, Economics and Political Weekly, Aug. २००५.

०९ Human Development Report, Government of Maharashtra-२००२.

१०. https://mahades.maharashtra.gov.in

११. Indian Economy, Datt & Sundaram, Gaurav Datt, Ashwini Mahajan, S.Chand Publishing, New Delhi, २०१२.

१२. Male-Female Ratio Imbalance in India, Chief Editor Dr.Vanmala Guntre, New Voice Publication, Aurangabad, २० Feb. २०१३.

१३. National Human Development Report, Government of India, २००१.

१४. दै. लोकमत, ३ नोव्हें. २००८, २१ सप्टें. २००८,२ जून २००९, १७ एप्रिल २०१५.

१५. दै. लोकसत्ता, द इंडियन एक्सप्रेस लिमिटेड, मुंबई.

१६. दै. सकाळ - सकाळ न्युज सर्व्हिसेस, औरंगाबाद.

संशोधक विद्यार्थी

(अमोल मनोहरराव घाटगे)
सहशिक्षक,
शारदा विद्यालय (माध्यमिक), परभणी

संशोधन मार्गदर्शक

(डॉ.आर.एम. भालेराव)
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शारदा महाविद्यालय, परभणी